# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०९/२०२४ (सोमवार) सकाळ**

## महामार्गावर मोकाट जनावरांच्या वावरामुळे अपघाताचे प्रमाणात वाढ झाली असुन मोकाट जनावरांच्या मालकांवर केली जाणार कारवाई

नागपूर ग्रामीण हद्दीत महामार्गावर मोकाट जनावरांच्या कळपामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असुन त्यामुळे होणाऱ्या अपघाताचे प्रमाणात वाढ झाली आहे. सदर बाबीची दखल **मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार** यांनी घेतली असुन ज्या मालकांची जनावरे रस्त्यावर मोकाट फिरत असतील अशा जनावरांच्या मालकांवर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहे. नागपूर ग्रामीण पोलीसांनी रस्ते वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या रस्त्यावरील मोकाट जनावरांच्या मालकावर कारवाई केली. यामध्ये पोस्टे देवलापार अंतर्गत एकुण ०८ जनावरांचे मालकांवर महाराष्ट्र पोलीस कायदा १००, १०६, १०७ अन्वये कारवाई करण्यात आली.

सदर कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे देवलापार येथील ठाणेदार सपोनि नारायण तुरकुंडे यांचे पथकाने पार पाडली.



## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. देवलापार :— अंतर्गत जुने पोस्टे देवलापार समोर एन. एच. ४४ हायवे रोड ०२ येथे दिनांक २२/०९/२०२४ चे ०७.५० वा. ते ०८.४० वा. दरम्यान देवलापार पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, जबलपूरकडुन नागपूरकडे एका लाल रंगाचा आयसर गाडी क्र. एम.एच.४०/सी टी— १२३५ ज्यावर कॅरेट बांधुन असुन त्यामध्ये गोवंश जनावरांची विनापरवाना व अवैधरीत्या निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन **आरोपी नामे— १) अल्लाउदीन रज्जाक भाई शाह वय ४० वर्ष रा. वार्ड क्र. ०४ बडी होली सारंगपुर ता. सारंगगपुर जि. रायगड .म.प्र. २) असलम खान अन्वर खान वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र. १५ मोहल्ला नयापुर सारंगपुर ता. सारंगपुर जि. रायगड .म. प्र.** याचे ताब्यात असणारा आयशर गाडी क्र. एम. एच—४०/सी टी— १२३५ नाकाबंदीचे दिशेने भरधाव वेगाने चालवित येतांना दिसला व नाकाबंदी पाहुन एकाएक रोडच्या बाजुला ट्रक थांबविला असता ट्रक ची स्टॉफसह पाहणी केली असता त्यामध्ये गोवंश जनावरांना कोंबुन त्यांना चाऱ्याची व बसण्याची कोणतीही सोय न करता दाटी वाटी मध्ये असुन पल्ल्याचे वर लाकडी फळया टाकुन त्यावर प्लास्टीक कॅरेट दिसुन आल्याने सदर गोवंश कत्तलीकरीता वाहतुक करीत असल्याचे दिसुन आल्याने ट्रक मध्ये असलेले क्रमाक १) २३ गोरे गोवंश प्रत्येकी किंमती १५०००/— रुपये प्रमाणे किंमती ३४५०००/—रू. २) ३ गोवंश बैल प्रत्येकी किमंत २००००/— रुपये प्रमाणे किमंती ६००००/— रुपये ३) २ गोवंश सांड प्रत्येकी किमंती २००००/— रुपये प्रमाणे किमंती ४००००/— रुपये ४) आयशर क्रमांक एम. एच—४०/सी टी— १२३५ किंमती १५०००००/— रुपये असा एकुण १९४५०००/— रुपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे फिर्यादी नामे— पो.शि. सचिन भगवान येळकर पोस्टे देवलापार येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम २८१ भान्यास सहकलम ११(१)(ड) प्रा.छ.अधी. सहकलम ५(अ), ९ म.प्रा.सं.का. सहकलम ११९ म.पो.का. १८४ मोवाका. काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे देवलापार येथील ठाणेदार सपोनि नारायण तुरकुंडे, पोहवा रविंद्र मेश्राम, पोलीस अंमलदार सचिन येळकर, केशव फड यांनी पार पाडली.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर